प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग**, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001

**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001

फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in

Website : www.rbi.org.in

ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

ऑगस्ट 5, 2019

**भारतीय रिझर्व्ह बँकेकडून अकरा बँकांवर आर्थिक दंड लागु**

जुलै 31, 2019 रोजीच्या एका आदेशान्वये भारतीय रिझर्व्ह बँकेने अकरा बँकांवर, आर्थिक दंड लागु केला असून, तो दंड, खाली दिल्याप्रमाणे, भारतीय रिझर्व्ह बँक फसवणुकींचे वर्गीकरण व अहवाल वाणिज्य बँका व निवडक एफआय कडून कळविले जाणे) निर्देश, 2016 च्या काही तरतुदींचे अनुपालन न केले गेले असल्याने लावण्यात आला आहे.

| **अनु. क्र.** | **बँकांची नावे** | **दंडाची रक्कम रु. करोड मध्ये)** |
|---|---|---|
| 1 | बँक ऑफ बडोदा | 0.5 |
| 2 | कॉर्पोरेशन बँक | 0.5 |
| 3 | फेडरल बँक लिमिटेड | 0.5 |
| 4 | इंडियन ओव्हरसीज बँक | 1.0 |
| 5 | जम्मू अँड काश्मीर बँक लिमिटेड | 0.5 |
| 6 | ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स | 1.5 |
| 7 | पंजाब आणि सिंध बँक | 1.0 |
| 8 | पंजाब नॅशनल बँक | 0.5 |
| 9 | स्टेट बँक ऑफ इंडिया | 0.5 |
| 10 | यूको बँक | 1.0 |
| 11 | युनायटेड बँक ऑफ इंडिया | 1.0 |

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या तो अधिनियम) कलम 46 (4)(आय) व कलम 51 (1) सह वाचित कलम 47 अ 1)(क) खाली आरबीआयला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन लागु करण्यात आला आहे. ही कारवाई विनियामक अनुपालनामधील त्रुटींवर आधारित असून, वरील बँकेने तिच्या ग्राहकांबरोबर केलेले व्यवहार किंवा करार ह्यांच्या वैधतेशी संबंधित नाही.

**पार्श्वभूमी**

असे आढळून आले की, सेंट्रल ब्युरो ऑफ इनवेस्टिगेशन कडून सीबीआय) फौजदारी कारवाई सुरु केली असताही , एखाद्या खात्यातील फसवणुक 'ताबडतोब' कळविण्यात यावी असे आरबीआयने सांगितले असूनही, वरील बँकांनी, आरबीआयला ती फसवणुक कळविली नाही/कळविण्यात विलंब केला व त्यामुळे आरबीआयने वरीलप्रमाणे दिलेल्या निर्देश/सूचनांचे अनुपालन केले गेले नाही. त्यामुळे वरील बँकांना निर्देशांचे पालन न केल्याने दंड का लावला जाऊ नये यासाठी नोटीस बजावण्यात आली त्यावर वरील बँकांकडून मिळालेली उत्तरे व वरील बँकांनी वैय्यक्तिक सुनावणीच्या दरम्यान केलेली सादरीकरणे व केलेल्या अतिरिक्त सादरीकरणांची असल्यास) तपासणी विचारात घेऊन आरबीआयने निष्कर्ष काढला की, आरबीआयने दिलेल्या सूचनांचे अनुपालन न केले गेल्याचे दावे सिध्द होत असून त्यासाठी, प्रत्येक बँकेने केलेल्या अनुपालनाच्या प्रमाणावर आधारित वरील अकराही बँकांना आर्थिक दंड लावणे आवश्यक आहे.

**योगेश दयाल**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2019-2020/351**